(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# प्राचीन भारतातील वैदिक आणि वेदोत्तर काळातील स्त्री सशक्तीकरण

**प्रा. डॉ. सर्जेराव सदाशिव जाधव** प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर.इ-मेल sjadhav.3034@gmail.com

---

**प्रस्तावना** :

प्राचीन भारताचा विचार केला तर वैदिक काळात स्त्रियांना समाजात मानाचे स्थान होते. त्या धार्मिक विधींमध्ये सक्रियपणे सहभागी होत. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता आणि त्या वेदांचा अभ्यास करत. ऋग्वेद आणि उपनिषदातील गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा, घोषा, विश्ववारा, आपाला, अदिती, सरस्वती, वाक, शश्वती, सूर्या, दक्षिणा, श्रुतावती, केतकी, शतरूपा, अनसूया, अहल्या, रेणुका, देवहुती, अरुंधती, जाहू, शिवा, वपुला, श्रीमती, वेदवती, धारिणी, रोमषा, सुलभा, यामी, इंद्राणी, सिकता, वडवा, वाचवनक्की, सिद्धा आणि स्वधा यांसारख्या विदुषी स्त्रिया तत्त्वज्ञान, वेदाध्ययन आणि शास्त्रचर्चांमध्ये भाग घेत असत. या काळातील स्त्रिया ब्रह्मविद्येच्या गूढ अध्ययनातून ऋषीका म्हणून ग्रंथरचना करीत. कांही स्त्रिया स्वतःच्या निर्णयानुसार संन्यास किंवा गृहस्थाश्रम स्वीकारीत. यावेळी स्त्रियांना विवाह, शिक्षण आणि सामाजिक जीवनात स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार होता. वेदोत्तर काळात मात्र महिलांची सामाजिक स्थिती हळूहळू खालावत गेली. स्त्रियांसाठी शिक्षणाची संधी कमी झाली आणि त्यांना धार्मिक विधींमध्ये सहभागी होण्यास मर्यादा घालण्यात आल्या. स्त्रियांवरील बंधने घट्ट होत
असताना दुसरीकडे मात्र द्रौपदी, सीता, अहिल्या, अनुसूया, कौशल्ल्या, तारा, शकुंतला, रुक्मिणी, यांसारख्या महिलांनी स्वविद्वतेतून, धर्माधिकारातून सशक्तीकरण साधले. या काळातही काही विदुषींनी तपाचरण व राजव्यवहार इ.तून स्त्री सशक्तीकरणाच्या विचारधारेत योगदान दिले. या पार्श्वभूमीवर वेदकालीन काही प्रमुख स्त्रियांच्या सर्वांगीण कार्यकर्तृत्वाचा परिचय करून घेऊ.

वैदिक काळातील स्त्री कर्तुत्व: सर्व स्मृतीकारांनी स्त्रियांना वेद अध्ययन व वेदाधिकार घेण्याबाबत तीव्र निषेध केला होता. तिने वेदमंत्र ध्यावयाचे नाहीत. वेदपठण करावयाचे नाही. वेदमंत्र ऐकायचे नाही. असा दंडक व निर्बंध समस्त स्मृतीकारांनी स्त्रियांना घालून दिला होता. याशिवाय गायत्रीमंत्र, गुरुचरित्रासारखे महत्वपूर्ण ग्रंथ पठण न करणे, असे निबंध स्त्रियांवर होते. परंतु वेदसंहिता जर पाहिली तर असे दिसते की, प्रत्यक्ष वेदमंत्रांची रचना ही स्त्रियांनीच केली आहे. अपाला, विश्ववारा, घोषा, लोपामुद्रा, सिकता, निवावरी, अशी जवळजवळ वीस स्त्रियांची नावे ऋग्वेदातील सूक्तांच्या कर्त्या ऋषींच्या नावांच्या यादीत आढळतात. वेदमंत्रांइतकाच ब्रम्हविद्येचाही स्त्रियांना अधिकार होता. मैत्रेयी, गार्गी, वडवा, वाचवनक्की या ब्रम्हवादीनी स्त्रिया उपनिषदात प्रसिद्ध आहेत. सीतासुद्धा संध्या करीत असल्याचा उल्लेख रामायणात आढळतो. तर मुलांप्रमाणेच मुलींचेही पूर्वी उपनयन असायचे. त्यामुळे तत्कालीन धर्ममार्तंडांनी फार पूर्वी स्त्रियांना वेदाधिकार दिले होते. मात्र मधल्या काळी त्याचा लोप होत गेला. वेदकालाचा विचार केला तर प्राचीन भारतात वेदांच्या रचनेमध्ये पुरुषांच्या बरोबरीने भारतीय विदुषी तथा साध्वींचेही मोठे योगदान आणि परंपरा असलेली पाहायला मिळते. गायत्रीमंत्र, वेदपठन, वेदसंहिता, मंत्ररचना, ग्रंथरचना आणि ब्रम्हसभेतील वाद-विवाद इ.मधून या स्त्रिया आपल्या तत्वज्ञानयुक्त बौद्धिक अधिष्ठानाचे सादरीकरण करीत सिद्ध होत होत्या. अशा काही उल्लेखनीय विदुषी पुढीलप्रमाणे....

१.गार्गी : प्राचीन भारतामध्ये ज्या ज्ञानसमृद्ध आणि विद्वान विदुषी आहेत त्यापैकी एक आहे गार्गी. गार्गीचे मूळ नाव वायरवी पण ती गर्गमुनिवंशात जन्मल्यामुळे तिचे नाव गार्गी असे रूढ झाले. ब्रह्मज्ञानी आणि विद्याप्रेमी असलेल्या मिथीलेच्या जनक राजाने आयोजित केलेल्या यज्ञामध्ये देशोदेशीच्या ब्राह्मण आणि पंडितांबरोबरच गार्गीही उपस्थित होती.
राजाने उपस्थितांना "जो सर्वश्रेष्ठ ब्राह्मज्ञानी आहे त्याने प्रत्येक शिंगाला दहा-दहा सुवर्णमुद्रा लावलेल्या एक हजार गायी घेऊन जाव्यात" असे आवाहन केले. त्या सभेमध्ये उपस्थित महाज्ञानी आणि वेदविद्या प्रवीण असलेल्या याज्ञवल्क्ने आपल्या शिष्याला 'गायींना घरी घेऊन जाण्यास सांगितले'. राजाने या कृतीचे कारण विचारताच याज्ञवल्क्ने उत्तर दिले की, 'मिथ्या अभिमान आणि अहंकाराचा त्याग हा ब्रह्मज्ञानी व्यक्तीचा विशेष आहे अशांना मी नमस्कार करतो आणि गायी पालनाचा मला शोक आहे त्यासाठी मी गायींना घेऊन जात आहे.' या उत्तरावर उपस्थित अश्वलमुनी त्याची ब्रह्मज्ञान परीक्षा घेण्याच्या उद्देशाने प्रश्न विचारतात. प्रत्येक प्रश्नाची उत्तरे समाधानपूर्वक मिळताच ते थांबतात पण एवढ्याने ब्रहमसभेचे समाधान व याज्ञवल्क्चे ब्रह्मज्ञानीत्व सिद्ध होत नाही. त्यावेळी गार्गी याज्ञवल्कला विश्वात ओतप्रोत भरलेल्या पण अदृशरूपातील ब्रह्म व अक्षरतत्वविषयी अनेक प्रःन विचारते; ज्या प्रश्नोत्तरांनी ब्रहमसभेचे पुरेपूर समाधान होते. त्यावेळी गार्गीच्या प्रश्नांतील विदवत्ता दिसून येते. गार्गीने आपले संपूर्ण जीवन वेदाध्ययन आणि भारतीयांना ब्रह्मचर्चेचे ज्ञान देण्यासाठी

खर्ची घातले होते. त्याचा प्रत्यय वरीलप्रमाणे येतो. विवाह करून संसार करताना आपल्या तत्व चिंतनात अडथळा येईल म्हणून ती आयुष्यभर कुमारी राहून ब्रह्मवादिनी बनते. (ब्रह्मवादिनी : शिक्षण पूर्ण होईपर्यंत अविवाहित राहणाऱ्या किंवा आयुष्यभर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थिनींना ब्रह्मवादिनी म्हटले जाते). वेदांच्या अनेक रचनांबरोबरच 'गार्गी संहिता' नावाचे पुस्तक ही तिने लिहिले आहे

२.मैत्रेयी : मैत्रेयी उपनिषदातील एक प्रसिद्ध विदुषी. ऋषी याज्ञवल्कची पहिली पत्नी कात्यायनी आणि दुसरी मैत्रेयी. दोघीही संसारात व्यस्त होत्या. कात्यायनी गृहकार्मात कुशल तर मैत्रेयी शास्त्रचर्चेत पारंगत. खूप वर्ष गृहस्थाश्रमात घालवल्यानंतर याज्ञवल्कने वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याचे दोन्ही पत्नींना बोलून दाखवले आणि म्हणाले, माझी जी सर्व संपत्ती आहे ती दोघींमध्ये समसमान वाटून घ्या. यावर मैत्रेयीने जे उत्तर दिले ते सभ्य जगातील श्रेष्ठींनाही मान खाली घालावी लागेल असे आहे. ती म्हणाली, 'आपण या संपत्तीची वाटणी केली ते ठीक आहे पण मला सांगा की ही संपत्ती घेऊन मी काय करू? हे तर साधारण धन आहे; सा-या पृथ्वीचे राज्य मला दिले तरी त्याचा मला काय फायदा? ते मला अमरत्व देणार आहे काय? या प्रश्नांवर याज्ञवल्क प्रसन्न झाले आणि म्हणाले, धन-संपत्ती आणि वैभवाने अमरत्व मिळू शकत नाही. पतीचे योग्य उत्तर ऐकून मैत्रेयी म्हणाली, "नाथ, ही धन-संपत्ती, विषय भोग घेऊन मी काय करू? ज्यामुळे अमरत्व प्राप्त होणार नाही. स्वामी, ज्या विषयात आपण ज्ञान प्राप्त केले आहे, ब्रह्मज्ञानरुपी धन जे आपण मिळवले आहे त्यासंदर्भात आपण मला उपदेश करून कृतार्थ करावे. आपल्या वानप्रस्थाश्रमात माझी अडचण होऊ नये म्हणून आपली सर्व धन-संपत्ती माझ्या मोठ्या बहिणीला म्हणजे कात्यायनीला द्या आणि ब्रह्मज्ञान मला देऊन माझ्या मनुष्य जीवनाचे सार्थक करा." असे सुंदर विचार आतापर्यंत कोणत्याही स्त्रीच्या मुखातून निघाले असल्याचे निदर्शनात नाही. आपल्या पित्या व पतीपासून प्राप्त केलेले ब्रह्मज्ञान केवळ आपल्या पुरते मर्यादित न ठेवता मैत्रेयीने ते इतरांनाही दर्शविले यातच तिचे महानत्व सिद्ध होते.

३.लोपामुद्रा : लोपामुद्रा (जिच्या सुंदर मुखदर्शनाने बघणा-याच्या मनातील दु:खाचा लोप होतो) ही विदर्भ राजाची सुंदर आणि लावण्यवती कन्या व महर्षी अगस्तीची साध्वी धर्मपत्नी. सत्यशील, रूपवती, सदाचारी आणि सर्वगुणसंपन्न अशी लोपामुद्रा आपल्या माता-पित्याबरोबरच इतरांच्याही संतोष आणि समाधानाचे कारण बनली. अशा सद्गुणी आणि विद्याप्रेमी कन्येला योग्य वर कोठे मिळेल या चिंतेत राजा मग्न होता.

एके दिवशी महान तपस्वी आणि ब्रह्मचारी अगस्ती मुनींना झाडावर लटकलेली मानवी

डोकी दिसली त्यावेळी त्यांनी त्यांना आपण कोण? आपली अशी अवस्था कशाने झाली आहे? असे प्रश्न करताच त्यावर 'आम्ही तुमचे पितर आहोत; तुम्ही आतापर्यंत लग्न केले नाही अथवा विवाहाची इच्छाही ठेवली नाही त्यामुळे आमची ही दशा झाली आहे' असे उत्तर दिले. जोपर्यंत आपण स्वतः अपत्यप्राप्ती करीत नाही तोपर्यंत आमचा उद्धार शक्य नाही. यावर विचार करून

अगस्तीनी आपल्यायोग्य स्त्री चा शोध सुरु केला. लोपामुद्रेची महती कानांवर आलीच होती त्यानुसार अगस्तीमुनी विदर्भ राजाच्या दरबारात पोहचलेआणि म्हणाले, पुत्रोत्पत्तीसाठी मी आपल्या सर्वगुणसंपन्न कन्येशी विवाह करू इच्छितो. हे ऐकून राजा चक्रावून गेला. नकार द्यावा तर हे तपस्वी शापदोष देतील आणि होकार द्यावा तर आपली सुलक्षणी कन्या एका वनवासी तपस्वीच्या हाती सुपूर्द करावी अशा संभ्रमात आपल्या राणीचे मत घेण्यासाठी महालात जातो. दोघेही चिंतेत असताना तिथे लोपामुद्रा येते. चिंताग्रस्त माता-पित्याना पाहून ती म्हणते, पिताजी, बेधडकपणे मला अगस्ती मुनींबरोबर पाठवा आणि स्वतःचे व राज्याचे रक्षण करा.

कन्येची मातृ-पितृभक्ती, समर्पणशीलता व मनाचा मोठेपणा पाहून राजाने तिचा विवाह अगस्ती मुनींबरोबर लावून दिला. राजकन्येचा साजश्रृंगार सोडून वल्कल वस्त्र धारण करून ती सहधर्मचारिणी बनली. देवता, अतिथी, गायींची आणि पतीची मनोभावे सेवा करू लागली. उभयतांनी तपोबल, शास्त्र, तत्वज्ञान, धर्म आणि कवित्व यांच्या बळावर गृहस्ताश्रम सफल केला. लोपामुद्राने ऋग्वेदाच्या पहिल्या भागातील १७६ व्या सूक्तातील दोन ऋचा रचल्या आहेत.

लोपामुद्रा आणि अगस्ती यांचा संसार आदर्श संसार होता. त्यांनी पती-पत्नींनी ईश्वराधना आणि गृहस्थाधर्माचे पालन कसे करावे, कामवासनेपासून दूर कसे राहावे, मनाची कमजोरी कशी टाळावी, विद्वान पुरुष आणि विदुषी स्त्रीने संसाराचा त्याग न करता जगाच्या कल्याणासाठी सुयोग्य, धार्मिक, बलवान आणि देशभक्त अपत्य जन्माला घालून ज्ञानज्योत कशी प्रज्ज्वलित करावी यासंदर्भात मानवजातीला बहुमोल असा उपदेश केला आहे.

४.घोषा : वेदाध्ययन करून ईश्वरविषयक ज्ञानाची सर्वत्र घोषणा अथवा प्रचार करणा-यास 'घोषा' असे म्हणतात. घोषा ही कुक्षिवान मुनींची कन्या. कोडाच्या आजाराने त्रस्त असल्याने विवाह होत नव्हता. देव-देवतांचे वैद्य अश्विनीकुमार यांच्या कृपाशीर्वादाने रोग बरा होऊन विवाह संपन्न झाला. पित्याप्रमाणे घोषाही विद्वान आणि सुप्रसिद्ध होती. ऋग्वेदातील दोन

सुक्तांचे ज्ञान घोषाला झाले होते, ज्यामध्ये उपवर कन्येने वेदाध्ययनापासून ते गृहस्थाश्रमात प्रवेश करेपर्यंतच्या सर्व कर्तव्यांचा उल्लेख होता. ऋग्वेदामधील हा उपदेश घोषा आपल्या सर्व बहिणींना व्यवस्थित देत होती. स्तुतीपाठ आणि वृत्तवैकल्य व ईश्वर नियमांचे पालन करणा-या घोषा या ब्रह्मचारीणीवर ईश्वरादी ऋषीमुनी सदैव प्रसन्न होते. ऋग्वेदातील सुक्तांचा अत्यंत सुंदर व भावयुक्त असा अर्थ घोषाने इतरांना समजावून सांगितला. वाणी, शुभकाम, प्रचार- प्रसार आणि सोमप्रमाणे पतीच्या प्रेमासाठी प्रार्थना कशी करावी याचा आदर्श वस्तूपाठ घोषाने तत्कालीन समाजात उपवर स्त्रियांसाठी घालून दिला होता. ‘अश्विनीकुमार’ आणि ‘घोषा’ यांच्यामध्ये सुसंवादातून विश्वातील गुढ गोष्टींचा उलगडा ही तत्कालीन स्त्रियांना मोठी ज्ञान पर्वणीच होती.

५.विश्व्वारा : विश्ववारा हिचा जन्म अत्रिमुनींच्या वंशात झाला. प्राचीन ऋषींनी विश्वरूप, विश्वप्राण, विश्वनियंता आणि विश्वदेव प्रभूची ध्यान-धारणा करून जे स्तोत्र रचले आहेत त्यांनाच वैदिक मंत्र म्हटले जाते. या रचनांमध्ये ज्या स्त्रियांचा सहभाग होता त्यामध्ये विश्ववाराचे नाव अग्रस्थानी होते. जी स्त्री स्वतः पापातून निवृत्त होऊन जगातील स्त्रियांमध्ये वैदिक धर्माचा प्रचार करून पापांचा नाश करते तला विश्ववारा असे संबोधतात. ऋग्वेदातील पाचव्या भागातील दुस-या अनुछेदातील २८ वे सुक्त हिने रचले आहे.यामध्ये ६ सूत्रे आहेत जी मोत्यासमान आहेत. ही ब्रह्मवादिनी वैदिक होमहवनांचा आणि शुभकार्याचा प्रचार करते. स्वतः हिने यज्ञ केला होता.

विश्ववाराने ज्या मंत्राचा उपदेश केला होता त्यायोगे तत्कालीन स्त्रियांना अखंड सौभाग्यप्राप्ती बरोबरच तिला ऐश्वर्य, अंतःकरणाची पवित्रता, मनाची स्थिरता, इंद्रियनियमन आणि जगाच्या कल्याणाचा अखंड ध्यास ही भावना स्त्रीमनात वाढीस लावण्यामध्ये मदत झाली.

६.सरस्वती : ब्रह्मा आणि सावित्री या उभयतांची अत्यंत सुंदर व रूपवान कन्या. समस्त विद्यांची साक्षात देवता असलेल्या सरस्वतीने वेदविद्या व शास्त्रार्थांचे अध्ययन करून आपले जीवन आनंदमय बनविले होते. गायनामध्ये इतकी निपुण होती की ते ऐकून केवळ मानवमात्रच नव्हे तर पशु-पक्षीही मुग्ध होऊन जात. संस्कृतपंडित आणि ग्रंथांमधील स्वर-व्यंजनयुक्त भाषेची निर्माती तीच आहे. सर्व विषयात गती असलेल्या सरस्वतीने व्याख्यानकलेचा प्रचार सर्वप्रथम केला. तिच्या भाषिक आचरणाने विद्या या शब्दाचा सरस्वती हा समानार्थी शब्द बनला. मानवी जगतामध्ये अत्यंत लोकप्रिय, प्रतिष्ठित व पूजनीय असलेल्या सरस्वतीला सुयोग्य वर न मिळाल्याने तिने आपले संपूर्ण आयुष्य ब्रह्मचर्यवस्था, वेदाध्ययन आणि नीतीयुक्त शिक्षण घेण्यामध्ये व्यतीत केले. सरस्वतीच्या या उदाहरणावरून हे लक्षात येते की, प्राचीन काळात उपवर कन्यांना विवाहाची इच्छा झाली नाही तर कुमारिका राहण्याची स्वतंत्रता होती. ज्ञानार्जन करणा-यांना सरस्वतीने विद्याभ्यासाचे नियम घालून दिले. आजच्या काळातही दिवाळी

सणामध्ये सरस्वतीची पूजा करूनच मुलांच्या शिक्षणाला आरंभ केला जातो.

७.अनसूया : अनसूया ही देवहुती आणि कर्दम ऋषींची कन्या. अनसूयाला आठ बहिणी आणि सांख्यशास्त्राचा लेखक कपिल मुनी हा भाऊ होता. बहिणींमध्ये अनुसया थोडी निरागस आणि धर्माची आवड असणारी होती. वेदांमध्ये अत्यंत निपुण आणि नेहमी नामजप आणि तपश्चर्यामध्ये मग्न असलेल्या अत्रि ऋषी यांच्याशी तिचा विवाह झाला. अनसूयाने ऋषींची सेवा करणे हा आपला धर्म मानला. आपले संपूर्ण कल्याण यातच आहे असा तिचा विश्वास होता. या सतीला जीवनात खूप त्रास सहन करावा लागला; परंतु ती धैर्याने आणि अभिमानाने वागल्यामुळे शेवटी आनंद मिळाला.

अनसूयेला दत्तात्रेय, दुर्वासा आणि रामचंद्र नावाचे तीन पुत्र झाले. हे तिघे विद्वान, कष्टाळू, धार्मिक, शूर आणि ईश्वरभक्त होते. त्यांपैकी दत्तात्रेय हे सर्वात बुद्धिमान, उत्साही, नीति-कुशल, दूरदृष्टी असलेले आणि देवाचे उपासक होते. शिक्षण पूर्ण झाल्यावर एके दिवशी ते आईकडे आले आणि विचारले- "आई, मी कोणाला शिक्षक बनवू?" अनसूया स्वतः खूप हुशार होती. ती म्हणाली -"मुला, हे संपूर्ण विश्व देवाच्या सृष्टीने शोभले आहे, त्यात सर्वत्र ज्ञान भरलेले आहे. माणसाकडे बुद्धी असली पाहिजे. सृष्टीच्या प्रत्येक पदार्थातून त्याला शिकवण मिळू शकते. देवाने निर्माण केलेल्या अलौकिक वस्तू मानवाला नैसर्गिकरित्या ज्ञानाचा संदेश देतात. माणसाच्या हृदयात ज्ञानाची तहान असेल तर या पृथ्वीपासूनही चांगले शिक्षण मिळू शकते. मोठ्या विद्वानाला गुरु बनवून काही फायदा होऊ शकत नाही. मग त्याच क्षणी देवीच्या चरणी वंदन करून दत्तात्रेय बाहेर आले आणि निसर्गातील विविध पदार्थांपासून उत्तम ज्ञान प्राप्त करू लागले. सरतेशेवटी, त्याकाळात, ते तत्वबोधी, आत्म आणि दैवी ज्ञानात अद्वितीय मानले गेले.

प्रभू रामचंद्र वनवासात अत्रि ऋषींच्या आश्रमात आले तेव्हा ऋषींनी त्यांचे आदरपूर्वक स्वागत करून त्यांना आपल्या पत्नीचे चरित्र सांगितले. सीताजींनी अनसूयेच्या चरणांची मोठ्या भक्तिभावाने पूजा केली. अनसूयाने सीतेचा चांगलाच सन्मान केला. त्यांना दैवी वस्त्रे परिधान केली, केसांना सुगंधी तेल लावले आणि मग त्यांना गोड शब्दात स्त्रियांचे गुण

सांगितले. हा सल्ला इतका चांगला आहे की प्रत्येक स्त्रीने तो लक्षात ठेवला पाहिजे. म्हणूनच गोस्वामी तुलसीदासजींनी आपल्या रचनांमध्ये त्याचे सुंदर वर्णन करून ठेवले आहे.

अनसूयाचे संपूर्ण आयुष्य पतीच्या सेवेत गेले. ती एका योगीनीप्रमाणे पतीच्या ध्यानात तल्लीन राहायची. पती आणि मुलगाही तिचा अत्यादर करी. अनसूयाच्या पवित्र उपदेशाचा प्रत्येक शब्द आपल्या हृदयाच्या पेटीत मौल्यवान अमृतासारखा जपून ठेवण्यासारखा आहे. अनसूयेच्या या भक्तीचा संपूर्ण जगतावर इष्ट असा परिणाम झाला आहे.

८.अहल्या: अहल्या ब्रह्माची कन्या मानली जाते. स्वयंवराच्या परंपरेनुसार, तिच्या सौंदर्याने मोहित झालेल्या ऋषी गौतम यांच्याशी तिचा विवाह झाला. सुरुवातीला पती-पत्नी दोघेही आनंदाने जगत होते. ऋषी गौतम यांच्या सहवासामुळे ती मोठी विद्वान आणि तपस्वीही झाली. पण नंतर एक अतिशय विचित्र घटना घडली. अहल्येचे आत्यंतिक सौंदर्यच तिच्या नाशाला कारणीभूत झाले.

तिचे सौंदर्य पाहून देवांचा राजा इंद्र तिच्यावर मोहित होऊन गौतमाचा वेश धारण करून अहल्येला संभोगासाठी प्रवृत्त करू लागला. इंद्राचे कपट ती ओळखू शकली नाही आणि त्याच्या प्रभावाखाली आली. झोपेतून जागी झाल्यावर हे गौतम नसून इंद्र असल्याचे समजतच तिला धक्का बसला. ऋषींचा रागही मनात आला. ती घाबरली आणि इंद्राला अनेक प्रकारे शाप देऊ लागली. तेव्हा इंद्र चोरासारखा गौतम ऋषींच्या आश्रमातून बाहेर पडत असताना ऋषी गौतम तेथे पोहोचले आणि इंद्र पळत असताना त्यांना दिसले. ऋषी गौतमांच्या तेजाने देव, दानव इत्यादी स्तब्ध झाले. गौतममुनी हेच खरे अग्नी असल्यामुळे इंद्रालाही क्षोभ जाणवत होता. दुष्ट इंद्र आपल्या वेशात आश्रमात येताना पाहून गौतममुनीही क्रोधाने भडकले. रागाच्या भरात त्यांनी इंद्राला शाप दिला - "हे दुर्मती ! तू गौतम बनून फारच अकल्पनीय गोष्ट केली आहेस. म्हणून मी तुला शाप देतो की तुझे रूप नष्ट व्हावे." यानंतर तो अहल्येला म्हणाला -"हे दुष्ट स्त्री! तुला या आश्रमात दगड होऊन अनेक वर्षे पडावे लागेल." अहल्येने नम्रपणे सर्व काही समजावून सांगितले आणि आपल्या पतीची माफी मागितली. गौतमऋषी म्हणाले- "ठीक आहे, जेव्हा राजा दशरथांचा मुलगा या घनदाट जंगलात येईल आणि त्याच्या चरणस्पर्शाने तुझा उद्धार होईल.

तेव्हापासून अहल्या दगड बनून अनेक वर्षे तेथेच राहिली. शेवटी श्री रामचंद्रजी, विश्वामित्रमुनी आणि लक्ष्मणजी यांच्यासह तेथे आले, तेव्हा विश्वामित्रजींनी त्यांना या आश्रमाचा जुना इतिहास सांगितला आणि त्यावर आपले चरणकमल ठेवण्यास सांगितले. रामचंद्रजींच्या पायाचा स्पर्श होताच अहल्याचा उद्धार झाला. शापातून मुक्त झाल्यानंतर रामचंद्रजींचे दर्शन घेताच तिला तीची पूर्वस्थिती कळली आणि त्याबद्दल पश्चात्ताप करून तिने मोठ्या भक्तिभावाने राम आणि लक्ष्मण यांच्या चरणी नतमस्तक झाली. यानंतर, अहल्येने आपले जीवन अत्यंत पवित्रतेने आणि सद्गुणांनी व्यतीत केले, ज्यामुळे आजपर्यंत तिची गणना भारतातील विशेष सतींमध्ये केली जाते. अशाप्रकारे, अहल्येचे जीवन हे या वस्तुस्थितीचे एक उत्तम उदाहरण आहे की जर एखाद्याने जाणूनबुजून किंवा नकळत केलेल्या दुष्कृत्याबद्दल मनापासून पश्चात्ताप केला आणि भविष्यात असे न करण्याचा संकल्प केला तर देव पतितांनाही वाचवू शकतो.

९.देवहुती: देवहुती ही शतरूपा आणि महाराज स्वयंभू यांची कन्या. वडिलांच्या घरी त्यांनी अनेक शास्त्रांमध्ये विशेष प्राविण्य मिळवले होते. यावेळी कर्दम नावाचा एक ऋषी मोठा विद्वान आणि अत्यंत धार्मिक होता. कर्दम ऋषींचे ज्ञान, पांडित्य आणि धार्मिकता पाहून देवहुती त्याच्यावर मोहित झाली आणि तिने आपल्या वडिलांना विनंती केली की ती या ब्राह्मण ऋषीशीच लग्न करेल. मुलीचे (देवहुती) हे योग्य विधान ऐकून वडिलांना खूप आनंद झाला आणि त्यांनी कर्दम ऋषीशी तिचा विवाह केला.देवहुतीला नऊ मुली आणि कपिल नावाचा मुलगा अशी दहा मुले होती. कपिल मोठा झाल्यावर त्याने देवहुती आणि आपल्या मुलींच्या देखभालीचा भार त्याच्यावर टाकला आणि कर्दमऋषी वानप्रस्थी झाले.

आपल्या देशात प्राचीन काळी अशी पुस्तके लिहिली गेली आहेत ज्यात जग, निसर्ग, मनुष्य, आत्मा, दैवी घटक, धर्म इत्यादी विषयांवर सखोल चर्चा केलेली आहे. ही तत्त्वज्ञानाची पुस्तके म्हणून ओळखली जातात. उपलब्ध असलेल्या तत्त्वज्ञानाच्या एकूण सहा पुस्तकांपैकी 'सांख्यदर्शन' हे प्रथम लिहिले गेले. सांख्यदर्शनासारखा दुर्मिळ ग्रंथ, ज्यात आत्मा आणि निसर्गाचे सार गंभीर तर्काने विवेचन केले आहे, ते सांख्यदर्शन महर्षी कपिल यांनी रचले आहेत, ज्यांचा जन्म देवहुतीच्या पोटी झाला आहे कपिलऋषींनी सांख्यदर्शन लिहून देश-विदेशात मोठी कीर्ती मिळवली होती.

विदुषी आणि ज्ञानवती माता देवहुती आपल्या विद्वान पुत्रासोबत विविध प्रकारच्या शास्त्रांची चर्चा करण्यात अत्यंत आनंदाने वेळ घालवत असे. कपिलने सांख्य रचल्यानंतर देवहूतीला त्यात लिहिलेले तत्वज्ञान शिकण्याची खूप इच्छा होती. एके दिवशी ती आपल्या मुलाला म्हणाली - "मुला, मी अनेक शास्त्रे वाचली आहेत, पण माझी जीवनातील आसक्ती थोडीही कमी झाली नाही. कारण 'मी' आणि 'माझे' ही भावना बाजूला ठेवून मला जीवनाचे सार, शुद्ध आत्मा ओळखता आलेला

नाही. म्हणून तू मला तुझ्या 'सांख्यदर्शनात' लिहिलेले मनुष्य आणि निसर्गाचे मर्म समजावून सांग की, त्यायोगे मी मोह्मायेतून मुक्त होऊ शकेन. कपिलने संपूर्ण सांख्यदर्शन आईला समजावून सांगितले आणि तिला वाचून दाखवले. आपल्या मुलाकडून आध्यात्मिक ज्ञान प्राप्त करून आणि वारंवार चिंतन आणि चिंतन केल्याने देवहुती हळू हळू
आपला अहंकार विसरली आणि भ्रमित आत्म्याला ओळखून तिने मुक्ती प्राप्त केली.

वैदिक काळातील वेदाध्ययनापासून भारतीय शिक्षण पध्दतीचा उदय झाला हे वरील विदुषी आणि ऋषिका यांच्या जीवनचरित्रावरून लक्षात येते. या काळात स्त्रिया सुशिक्षित होत्या. त्यांना विद्याभ्यासाचे स्वातंत्र्य असल्याचे दिसते. वेदकाळापासून आर्य काळापर्यंत अनेक स्त्री विदुषी भारतात निर्माण झाल्या. वेदोत्तर काळात मात्र स्त्रियांची सामाजिक स्थिती हळूहळू खालावत गेली. स्त्रियांसाठी शिक्षणाची संधी कमी झाली आणि त्यांना धार्मिक विधींमध्ये सहभागी होण्यास मर्यादा घालण्यात आल्या. स्त्रियांवरील बंधने घट्ट होत असताना दुसरीकडे मात्र द्रौपदी, सीता, अहिल्या, अनुसूया, कौशल्ल्या, तारा, शकुंतला, रुक्मिणी, यांसारख्या महिलांनी विद्वतेतून, धर्माधीकारातून सशक्तीकरण साधले. या काळातही काही विदुषीनी तपाचरण व राजव्यवहार इ.तून स्त्री सशक्तीकरणाच्या विचारधारेत योगदान दिले.

**निष्कर्ष**:

एकूणच वैदिक काळात स्त्रिया सशक्त असून समाजातील तिचे स्थान पुरुषांच्या बरोबरीचे होते. त्यांना स्वगृही मान दिला जात होता. त्यामुळे तत्कालीन काळात स्त्रिया 'सद्योवधू'(विवाह होईपर्यंत शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना सद्योवधू असे म्हटले जात.) व 'ब्रह्मवादिनी' होऊ शकल्या. वेदोत्तर काळात महिलांचा शिक्षण, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये सहभाग कमी झाला. तथापि, स्त्रियांवरील निर्बंधांविरोधात संघर्ष सुरू राहिल्याने स्त्रियांना हक्क आणि सशक्तीकरणाची संधी मिळू लागली. वैदिक काळात स्त्रिया बौद्धिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या स्वतंत्र होत्या, परंतु वेदोत्तर काळात त्यांच्यावर विविध निर्बंध आले. आधुनिक काळात स्त्रिया पुन्हा सशक्त होत असून आज शिक्षण, तंत्रज्ञान आणि सामाजिक सुधारणा यांच्या माध्यमातून त्यांचे सक्षमीकरण वाढत आहे. स्त्रीसशक्तीकरणासाठी वैदिक परंपरेतील मूलतत्त्वे आणि आधुनिक संधी यांचा समन्वय आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ**:

१) रामचंद्र वर्मा अनुवाद, भारत के स्त्री रत्न: वैदिक काल पहला भाग, सस्ता साहित्य मंडळ,दिल्ली.
२)गायधनी रं. ना., राहुरकर व. ग.,प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास,कॉन्टिनेंटल प्रकाशन,
३)जोशी पी. जी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००३
4)डॉ.एम.एस.गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन्स,
औरंगाबाद, जुले २०१३,
५)डॉ. विजया साखरे, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर,जून २०१३६.
६)डॉ.आ.ह.साळुंखे,महाभारतातील स्त्रिया (भाग-२),सुगावा प्रकाशन,पुणे,आवृत्तीचौथी, एप्रिल २००६.
७)आ.ह.साळुंखे,हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह प्रकाशन.